Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# ग्रामीण संस्कृतीचा अतिस्वर - दुर राहिला गाव

**प्रा. बनसोडे के. आर.**
मराठी विभाग
अंकुशराव टोपे महाविद्यालय,
जालना

इंद्रजित भालेराव हे मराठी साहित्यातील एक लोकप्रिय कवी आहेत. त्यांनी काव्यलेखनाबरोबरच ललित लेख, समीक्षात्मक लेखनही केले आहे, १९९० नंतरच्या कालखंडात सृजशील लेखक म्हणून ते ओळखले जातात. त्यांच्या काव्याबाबत असे म्हणता येईल की, ''गाव कुसातील अस्सल ग्रामीण संस्कृतीचं लेनं ल्यालेली, मातीशी स्थान राखलेली, खडतड वाटचाल तुडवित, नव्या जीवनाशी संधान बांधलेली त्यांची कविता होय ''ग्रामीण साहित्याच्या चळवळीला योग्य दिशा देण्याचे काम त्यांच्या कवितेने केले आहे. त्यांनी 'पीकपाणी', 'आम्ही काबाडाचे धनी', 'दूर राहिला गाव', 'कुळंबिणीची कहाणी', 'गावाकडं चल माझ्या दोस्ता', 'टाहो मुलुख माझा' इत्यादी काव्यसंग्रह तर 'गाई घरा आल्या',' लळा', 'लिफनसाज' हे ललित लेखन, 'भिंगुळवाणा'ही कांदबरी 'ताराबाई शिंदे' चरित्र व वैचारिक, 'घरीदारी' हे व्यक्तिचित्र 'उगवले नारायण' हे लोकसाहित्य विषयक, तर 'बहिणाबाई चौधरी' हे काव्यास्वाद पर लिखान. 'संत जनाबाई' निवडक लेखन तर 'मऱ्हाटवाडी' हा समिक्षात्मक ग्रंथ प्रकाशित. अशा प्रकारची विपूल ग्रंथ संपदा त्यांनी निर्माण केली. त्यांच्या कवितेला अनेक पुरस्कार प्रदान झाले.

शेतकरी नेते शरद जोशी यांच्या समवेत वावरत असतांना असे म्हटले जात होते की, 'त्यांच्या कवितेनेचं शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमाची सुरुवात होत असे तर जोशी यांच्या अध्यक्षीय भाषणाने त्याचा समारोप होत असे' असे सामर्थ्य त्यांच्या कवितेचे आपणास सांगता येईल, त्यांनी ग्रामीण जीवन जवळून पाहिले, भोगले, अनुभवले तेच विषय कवितेच्या माध्यमातून मुखर केले आहे. समाज जीवनातील वास्तव अनुभव साकार करणे हे इंद्रजित भालेराव यांच्या कवितेचे महत्वाचे वैशिष्टये होय, शेतकऱ्याचं जगणं, जगण्याचे तंत्र, त्या तंत्रातून त्याचा निघणारा अतिस्वर, दाह, वेदना, दु:ख यांना वाचा फोडण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेत आहे.

'दूर राहिला गाव' हा इंद्रजित भालेराव यांचा गाजलेला काव्यसंग्रह होय, तो प्रतिभास प्रकाशन, परभणी यांनी १९९४ साली प्रकाशित केला आहे. त्याच्या तीन आवृत्या निघाल्या आहेत. ग्रामीण जीवनाचे वास्तव मांडणारा काव्यसंग्रह म्हणून तो ओळखला जातो. या काव्यसंग्रहात एकूण ५६ कविता आहेत; पण एकाही कवितेला शीर्षक नाही. कमी शब्दात आशय सांगणाऱ्या कविता यामध्ये आहे, एक दिर्घ काव्यसंग्रह तो वाटतो, काही कविता मोठया अंभगामध्ये आलेल्या आहेत, त्या पहिल्या तीन चनणात सहा, सहा अक्षरे तर चौथ्या चरणात चार अक्षरांचा समावेश आहे. तालात, सुरात गाता येईल अशी गेयता त्यांच्या कवितेत आहे. ग्रामीण कवितेचा विचार करतांना विश्वास जहागीरदार असे म्हणतात की, ''ग्रामीण

कवितेमध्ये बाहय वास्तव हे खेडे, निसर्ग आणि पारंपरिक मूल्य यातून घडलेले ग्रामजीवन आहे आणि त्या आकाररुपाला आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवाविषयीच्या प्रतिक्रिया देत असते. अशा कवितेची निर्मितीच्या बुडाशी असलेली संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता आहे आणि अशी कविता ग्रामीण आहे, असे स्थूलमानाने म्हणता येईल. '[१] ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण त्यात केले जाते, असे वाटते. लेखक म्हणतात, ''ग्रामीण वास्तव केंद्रस्थानी ठेवून वास्तवपूर्ण चित्रण ग्रामीण कवितेत केले जाते.''[२] ग्रामीण साहित्याच्या वास्तवशील प्रवाहाचा एक भाग म्हणून ग्रामीण कवितेचा विचार करावा लागेल. ग.ल.ठोकळ, ना.घ. देशपांडे, अनंत काणेकर, सोपानदेव चौधरी, वि.भी. कोलते, ग.ह. पाटील, भ.श्री. पंडित, ना,घ, देशपांडे, र.वा. दिघे, आनंद यादव 'हिरवे जग', 'राजामहान डहाळी', सरोजिनी बाबर 'पाळणा', सदाशिव माळी 'फुलमाळ', पुरुषोत्तम पाटील 'तळयातल्या सावल्या' , ना.धो. महानोर 'रानातल्या कविता', विठठल वाघ 'साय', शंकर वडे 'इरवा', गणेश कुडे 'आभाळाचं दान', शाम कुलकर्णी 'गवळणी', रा.रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, महादेव गोरे, सोपान दाळमकर, फ.म. शहाजिंदे, उत्तम कोळकर, राजन गवस 'हुंदका', मोहन पाटील 'गाव आणि मातीच्या कविता', माधव थोरात 'आपून तर माणस हायं', टी.एन. परदेशी 'कौतुकी', वसंत पाटील, सनानंद देशमुख, महेंद्र पाटील, प्रकाश किनगावकर, यांच्या बरोबरीने काव्यलेखनावर आपला प्रभाव टिकून असलेले कवि म्हणजे इंद्रजित भालेराव होय.

इंद्रजित भालेराव यांचा 'पिकपाणी' १९८९ हा काव्यसंग्रह मराठवाड्यातील बोली भाषेचा अस्सल अविष्कार आहे. त्यांची कविता गावापेक्षा, शेतात अधिक रमतांनी दिसते. पण गाव आणि शेतं हे एकमेकांपासून कधीच वेगळ करता येत नाही. हा अनुभव यातून येतो, कारण ग्रामीण जीवनात अनेक खरतड वाटा असतात, त्या वाटेवर अनेक संकटे येतात, म्हणून कवि म्हणतात, 'काटया कुटयाचा तुडवित रस्ता, माझ्या गावकडं चाल माझ्या दोस्ता' अशा कविता विद्यार्थ्यांच्या गळामुखी उतरतांना दिसतात.

'दुर राहिला गाव' या त्यांच्या काव्यसंग्रहातील पहिल्याच कवितेत आईने मुलाला वाळत ठेवलेल्या दाळीवर लक्ष ठेवण्यासाठी सांगीतलेले असते पण ती दाळ खाण्यासाठी गाईचा खांडव येतो. त्यामुळे तो मुलगा भेदरतो, दुर शेतात वडिलांची न्याहारी नेतांना सुध्दा भाजीचे गाडगे फुटते, अनेक दिवसाची ऊस खाण्याची ईच्छा पूर्ण होईल म्हणून ऊस तोडतांना माळी पुढे असतो तर अंगात कपडा नाही म्हणून बोदंरी वेचून पैसा मिळवतो, कवि म्हणतात की,

'ढोरामागं महिनाभर
बोंदरी वेचून कमवलेल्या दीड रुपयात
दिवाळीला शिवलेला सदरा
सागरगोटयाच्या जाळीत अडकून फाटला
तेव्हा भांबावून गेलो आपण' [३]

शेतकऱ्याच्या मुलाला इतकी कामे असतात की, त्यांना त्या कामातून सुटकाच करता येत नाही आणि दारिंद्रय हे पाचविला पुजलेलं. घरात जेवणाचा साधा डब्बाही त्याला घेता येऊ नये, कपडयासाठी कापसाच्या शेतातील खाली पडलेला कापूस विकून दिवाळीला कपडे घेणारा दारिंद्रीनायक या कवितेत

भेटतो. बैल, गाय, वासरे, कोंबडया, शेळया, मेंढया, पोपट, मांजर ही शेतकऱ्यांची शेती बरोबरीची दैवत व सोबत असत. तो जनावराला चारण्यासाठी कुरणावर जातो तर जाळीत, कुपाटीत, पेंढीत, रानमळयात, ओढयाच्या डोंगरात विशारी सापापासून स्वत:चा जीव वाचवावा लागतो, गावगाडयातील माणसं एकमेकांचा विस्वास, आदर करतांना नाती जपतांनी दिसतात. आपल्या माणसापासून कितीही दु:ख झाले तरी अटी-तटीच्या वेळी ते मदतीला धावून येतात ; पण ग्रामीण स्त्री आपल्या पतीने परस्त्रीकडे जाऊ नये यासाठी खंबीर भूमिका घेते. कवि म्हणतात की,

'गाव सोडून जाणाऱ्या
नायकिनीची घुगरं
आठवण म्हणून
हलकडीला बांधून ठेवणारा दादा
घुंगरं घराबाहेर फेकल्याशिवाय
मी परत येणार नाही
अस धमकावून
माहेरात जाऊन बसलेली वहिणी'[४]

ग्रामीण भागात शेती कसत असतांना खुप कष्ट उपसावे लागतात, शिणभाग हलका व्हावा म्हणून जोशी, कोल्हारी, नाचकाम करणाऱ्या स्त्रीयांचे ताफे येतात. येतांनी ते सुख देतात पण जातांनी मात्र अनेक जनांना लळा लाऊन जातात.अशाच एका व्याक्तिला नायकिनीने लावलेला लळा त्याला सोडवत नाही. ग्रामीण जीवनात संस्कृतीला महत्व असते. ती जपण्यासाठी, देवाचे नामस्मरण, भजन, किर्तन हे चालते ;पण ती जर का बुडवण्याचा प्रयत्न केला की, त्याला शिक्षा दिली जाते. आंघोळीला काढलेल्या पाण्यावरुन कावळा उडाला म्हणून आजीला मरणारा आजा ही दिसतो. कष्ट करुनही परिस्थितीत सुधारणा होत नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या मुलाला केसाचा फुगा पाडत असताना सांडणीचे चटके बसतात. तर २६ जानेवारी, १५ ऑगस्ट रोजी स्वच्छ धुतलेल्या कपडयाला इस्त्री करावी असे वाटते; पण इस्त्री घेण्याचीही ऐपत असत नाही म्हणून आंबट ओल्या कपडयाचीउशाला घडी करुन ठेवल्याने सकाळी आंबट वास येऊ लागतो.

दारिंद्र, उपासमार, कष्ट हे त्यांच्या पाचविलाच पुंजलेलं असत .म्हणून कवि म्हणतात,

'दादा रुसून बसलाय म्हणून
बाबानं सांगताच
पोळयाच्या दिवशी
पडत्या पावसात
पळतपळत जाऊन
बैल फिरायच्या वेळेपर्यंत
घुंगर माळा येऊन येणारा' [५]

ग्रामीण संस्कृतीत सण-उत्सवाला खूप महत्त्व आहे पण सणाला लागणारे साहित्य, आणण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसतात. त्यामुळे काबाड कष्ठ करणारा शंकर महार रात्रीच अंथरुणात मरुन पडतो. तर सापापासून आपल्या पिलाला वाचवणारी लाव्हरं दिसते.

ग्रामीण व्यक्ती सकाळी तांबडे फुटताच उठून कामाला जाण्याची तयारी करतो, त्यांच्या स्वागतासाठी सूर्य, चिवळ, चिमणी, वाकळाची फुल, हरबऱ्याची फुल, करडयाची फुल ही सोबत असतात. पावसाच्या पाण्याने उकिरडयात उगवलेली कोवळी अंब्यांची रोप असतात. ग्रामीण स्त्रीला कपाळाचे कुंकु आणि वंशाचा दिवा हा नेहमी जीवंत असावा असे वाटते. वंशाला दिवा असावा म्हणून अमोशाच्या रात्री, चोपनाच्या रानातील आंब्याखाली अपत्य नसलेल्या स्त्रिया अघोरी कृत्य करतांना दिसतात. पिक पेरणी पासून ते मळणीपर्यंत शेतकऱ्याला, खुरपणी,विरळणी, डवरणी, खोदणी, कापणी, मळणी, उफणणी इ. कामे करावी लागतात. धान्याची रास ही चेटकीनीने नेऊ नये म्हणून ज्या उंबराच्या झाडाखाली दत्तात्र्ये थांबले होते, त्याची फांदी मदनात ठेवतात. प्रत्येक शेतकऱ्याला असे वाटते की, आपली इडा पिडा कधी जाईल यासाठी तो देवाला प्रार्थना करतो; पण त्याच्या पोटी बळी न येता वामनच येतो आणि त्याचे जीवन उध्वस्त करतो.

अनवणी पायाने तो आपल्या जीवनाचे गीत गातो. शेतीसाठी आवश्यक असणारी अवजारे, टिकाव, फावडे, कुऱ्हाड, टोपले, खुरपे, पास, यांच्या सहाय्याने तो स्वत:चे पोट भरतो. म्हणून कवी म्हणतात,

“खुरप्याच्या आणीला मी
देतो अशी धार
खुरप्याची आणी माझ्या
पोटाचा आधार
खुरप्याच्या आणीवर
पिकतो शिवार
बोरावाणी दाने देते
टाकळी जेवार”[६]

‘खुरप्याची आणि सोन्याचे पाणी ’अशी म्हण ग्रामीण भागात प्रचलीत आहे, जर पिकाला खुरपले तर तणाचा नाश होतो आणि पिके चांगली येतात.

ऋतु जसे येतात तसे ऋतुचक्रही बदलते, मराठवाडा हा भूभाग तसा नेहमी आवर्तनातच सापडलेला. दर दोन-तीन वर्षाला येथे दुष्काळ पडतो. येथील जमीन मध्यम काळी, डोंगर माथ्याची ,गंगेचे खोरे आहे पण तेथे ही पावसाळयापर्यंतच पाणी असते, कधी ओला दुष्काळ तर कधी कडक उन्हाळा. अशा दु:खाच्या झळा शोषणारा शेतकरी येथे दिसतो. काळ बदलला, वेळही बदलला. औद्योगिक क्रांती झाली, शेतीच्या विकासासाठी वेगवेगळया तंत्रज्ञानाचा वापर करुन उपक्रम घेऊ लागले. पण शेतकऱ्यांकडे येणाऱ्या ज्या योजना आहेत, त्यामध्येच अडकल्या म्हणून कवी म्हणतात,

“मोट झाली जुनी तशी इंजिनही झाले जुने

माणसाच्या भल्यासाठी सगळयांचे येणे जाणे''[७]

मोट गेली, इंजिनही गेले आणि आता विजेवर चालणारे सबर्सिबल पाईपच्या मोटारी आल्या, पण त्यासाठी लागणारी विज ही लपंडाव खेळयासारखी असते. म्हणून शेतकऱ्याला रात्रीच्या वेळी शेताला पाणी देण्यासाठी जावे लागते. दिवसभर, शेतात काम आणि रात्रीचे दारे धरणे यावून त्याच्या जीवला आराम मिळत नाही.

शेतकऱ्याच्या विकासासाठी शासनाने अनेक योजना आखल्या, विज आणली, सुधारीत बी-बीयाने, इलेक्ट्रॉनिक मोटारी, पाणी आडवा पाणी जिरवा या योजना आल्या, गावात दवाखाने आली, शाळा आल्या, पाटलाचा एकछत्री आमल जाऊन लोकशाहीच्या बहुमताने निवडलेला सरपंच आला. लोक शिकू लागले, आपले अनुभव मांडू लागले पण माझा गावं या सगळयापासून वंचित राहिला म्हणून 'दूर गेलेला गाव 'दु:खमय सागरात बुडाला की काय असे वाटते. म्हणून कवी म्हणतात,

''मी पाहतो तुझा गाव
आणि तु येतोस माझ्या गावाला
उगाच कौतुक करतो आपण,
एकमेकांच्या आईबापाचे, घरादाराचं''[८]

जागतिकिकरणाने कुटुंबाचे विलगीकरण झाले, शेतीच्या विभागण्या झाल्या, वाडयांना खिंडार पडले, वाडयातील माणसे आढ्यासोबत न राहता वेगळी वाट धरु लागले, हे यातून जाणवते. उभ्या झाडाला लागावी वाळवी तसा त्यांचा संसारही उघडे डोळे करुन उभा आहे, घर धनीला आपल्या धन्याचा जाच असतो तसाच सासूरवासीनलाही असतो, कवी म्हणतात,

''रानावनातल्या उन्हातान्हात वाळलेल्या
सासुरवाशीन गोवऱ्या वेचते
आपल्या फाटक्या जिनगाणीचा पदर
एकदाचा खच्चून कमरेला खोचते''[९]

रानावनात फिरुन ती गोवऱ्या वेचण्याचे काम करते. तीला चुलच पेटवायची नसते; तर पेटवायचा असतो जिनगाणीचा जाळ. एवढे करुनही तिला सत्वशील राहता येत नाही.

गाव कसा दूर जातो याचे वर्णन करत असतांना कवी म्हणतात,

''पारामागं घोंगडी पांघरुन बसलेलं सुख
अशात आलंच नाही गावात
एखाद्या खोडेल गाईन इत चुकवावं
तसा ऋतु चक्रातून हिवाळाच गायब झाला''[१०]

हा हिवाळा गायब झाल्यामुळे मारोतीच्या मंदीरामागे लपून बसलेले हिव गायब घेते परिणामी पोर्णिमेला हिरवळ करपून जाते. पाण्यात पडलेला ढेकूळ विरघळून जावा तळाला तसा इथला अंधारही बुडत जातो. ऐन दिवाळीला. अशी स्थिती निर्माण होते.

शेतकऱ्याची मुलं शिक्षणाच्या निमित्ताने, नोकरीच्या निमित्ताने बाहेर जातात, त्यांना आई वडिलांची आठवण येते. आपल्या शेतीची आठवण येते म्हणून ते एसटीने येतात-जातात. आल्यावर त्यांना येथील शेतं वादळवाऱ्यात उडून गेलेली दिसतात. आषाढ-श्रावणात निघणाऱ्या दिंडयाचेही त्याला अप्रुप वाटते.पंढपुरच्या विठ्ठलावर त्याची श्रध्दा आहे, म्हणून तो दिंडी मध्येही सामील होतो, पण पांडूरंग त्याच्या मदतीला आला नाही म्हणून तो म्हणतो,

"पांडूरंग तुझा । झाला का आधार
तुझा त्याने भार । वाहिला का"

असा प्रश्नही त्याला पडतो. आर्त स्वराने भगवंताचे नामस्मरण तो करतो, किर्तन करतो, आरत्या करतो पण त्याच्या वाटयाला नैराश्य येते, म्हणून कवि म्हणतात,

"किती आर्त तुझ्या । गळयातले स्वर
किती ताणू तार । विणेची या"

काळ बदलतं गेला, साधनेही नविन आली, कॅम्प्युटर आले, मेमरी आली पण ते नाहीशे करण्याला मंबाजी सारखा व्हायरसही आला. ज्याने तुकारामाला मारण्याची युक्ती केली तशी आता आधुनिक साधनाने शेतकऱ्यांची होते. जो हजारो जनांचा अन्नदाता असतो, त्याच्या कडेच स्वत:चे पोट भरण्यास धान्य नसते अशा शेतीमध्ये पाण्याअभावी वणवा पेटला, मानुष्कीशी नाळ तुंटली, मनात ठेवलेल्या भावना जळाल्या म्हणून त्याने शेती सोडली, नोकरी धरली आणि त्याला वाटते जळालेल्या मातीला वाचवण्यासाठी कोणी भूमीपुत्र येईल याची तो वाट पाहू लागला. अशाप्रकारे ग्रामीण संस्कृतीचा आर्तस्वर- 'दुर राहिला गाव' या काव्यसंग्राहात कवि इंद्रजित भालेराव यांनी मांडला आहे. आपला हात आणि जगन्नाथ हे या कवीचं जीवन सुत्र आहे आणि तत्वज्ञान ही आहे म्हणून कवी म्हणतात,

"केव्हा एकदाची । ओलांडतो शिव । टाकायचे शेव । उजेडाचे"

शेतकऱ्यांचे दु:ख हे क्षितीजापार आहे, तो कधीही कमी होणार नाही. ग्रामीण जीवन साक्षात करण्यात इंद्रजित भालेराव यांची कविता सरस आहे असे वाटते. बाळ सुर्यासारखी, लालजर्द आंब्याची रोपं, खुरप्याची आणी वर पिकतो शिवार, बोरावाणी दाने देते टाळकी जेवार, उभ्या झाडाला लागावी वाळवी तसा त्याचा संसार .अशा प्रकारच्या उपमा, उपमेयाच्या माध्यमातून कविने आपली कविता शब्दबध्द केली आहे.

**ग्रंथसूची**

१. विश्वास जहागीरदार : म.स. पत्रिका जुलै - डिसेंबर - १९८७, पृ.क्रं. ८९
२. ईश्वर नंदपुरे संपादक : साहित्य ग्रामीण आणि दलित, विजय प्रकाशन, नागपूर प्र.आ. २००२ पृ.क्रं. ७८
३. इंद्रजित भालेराव : दुर राहिला गाव, प्रतिभास प्रकाशन, परभणी तृ.आ. २००९, पृ.क्रं. ९
४. तत्रैय : पृ.क्रं. ११
५. तत्रैय : पृ.क्र. १३
६. तत्रैय : पृ.क्रं. २५